# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शासकीय एकलव्य पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(१) ५५१५ (०९-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या दुर्लक्षामुळे शासकीय एकलव्य पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना सुविधांच्या अभावामुळे आंदोलन करावे लागल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांच्या सामूहिक वनहक्क दाव्याच्या प्रस्तावाबाबत

**(२) १०६०० (१०-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना सन २००६ च्या अधिनियमांतर्गत वनजमिनीवरील सामूहिक वनहक्क दाव्याचा प्रस्ताव प्राप्त करून घेण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१५ पासून विशेष मोहिम राबविलेली होती, हे खरे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१) अंतर्गत गौण वनोपजांचे सामूहिक वनहक्क दावे प्राप्त करुन घेण्यासाठी विशेष मोहिमेअंतर्गत जनजागृती केली तसेच विशेष कार्यशाळा आयोजित केली. त्यामध्ये सामूहिक दाव्यांचे प्रस्ताव उपविभागस्तरीय समितीकडे मान्यतेस्तव सादर करणेसाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्यात आला. सदर विशेष मोहिमे अंतर्गत राबविण्यात आलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील ८ उपविभागामध्ये एकूण २२३ सामूहिक वनहक्क दावे उपविभागीय स्तरीय समितीकडे प्राप्त झाले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नवबौद्धांचा केंद्र व राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीत समावेश करण्याबाबत**

**(३) २८६१० (२३-१२-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारच्या निर्णयानुसार धर्मांतरीत नवबौध्दांचा केंद्राच्या तसेच राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीत समावेश करण्यासाठी शिफारस करण्याचा निर्णय राज्य शासनाने, ऑगस्ट २०१५ च्या दुस-यां आठवडयात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) अनुसूचित जातीतील धर्मांतरीत बौध्द या प्रवर्गाचा अनुसूचित जातीत समावेश केंद्र व राज्य शासनाने न केल्यामुळे महाराष्ट्र शासन अनुसूचित जातीच्या धर्मांतरीत बौध्दांना ज्या नमुन्यात अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करतात ते प्रमाणपत्र संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) व केंद्र शासनातील इतर विभाग ग्राह्य धरीत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या उमेदवारांना शासकीय सेवा, नोकरीपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच सदर प्रकरणी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने घटना (अनु.जाती) आदेश (सुधारणा) कायदा १९९० दि.३.६.१९९० अन्वये घटना (अनु.जाती) आदेश १९५० मध्ये सुधारणा केल्यानुसार अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना राज्य तसेच केंद्र शासनाच्या घटनात्मक आरक्षण व इतर सवलती अनुज्ञेय आहेत, अशी तरतूद शासन निर्णय दि.८ नोव्हेंबर, १९९० मध्ये केलेली आहे.

(२) केंद्र शासनाने अनुसूचित जातीसाठी निर्धारित केलेल्या जातप्रमाणपत्राच्या नमुन्यात अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असल्यास ते प्रमाणपत्र संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) व केंद्र शासनातील इतर विभाग ग्राह्य धरतात, हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

दिनांक १ सप्टेंबर, २०१२ रोजी पारित केलेल्या जातपडताळणी नियमांनुसार अनुसूचित जातीत धर्मांतरीत बौध्द / नवबौध्द व्यक्तींसाठी प्रमाणपत्राचा नमुना क्र.५(६) ७ निश्चित केलेला असून त्या विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. अशा व्यक्तींना राज्य शासकीय सेवा, शैक्षणिक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक यासाठी असलेले आरक्षणाचे लाभ मिळण्यासाठी कोणत्याही अडचणी येत नाहीत. तथापी, अनुसूचित जातीतील धर्मांतरीत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रमाणपत्राचा नमुना केंद्र शासनाने निश्चित केलेला नाही. त्यामुळे बौध्द धर्मांतरीत अनुसूचित जातीच्या व्यक्तींकरिता जातपडताळणी नियम-२०१२ नियम ५ (६) नमुना-७ प्रमाणे राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यात जातीचे प्रमाणपत्राचा नमुना केंद्र शासनाने मान्य करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या रानवड शाखेत सीसीटीव्ही बसविण्याबाबत**

**(४) २९२५४ (२२-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जिल्हा मधवर्ती सहकारी बँकेच्या रानवड शाखेत झालेल्या प्रकरणानंतर या बँकेच्या सर्व शाखामध्ये सीसीटीव्ही बसविण्याबरोबरच लॉकर्स आणि स्ट्रॉग रुम असलेल्या शाखामध्ये शस्त्रधारी सुरक्षारक्षक नेमण्याचा संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे व याबाबतचा ठराव विभागीय सहनिबंधक तसेच नाबार्डला पाठवला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजूरी देवून सदर बँकाच्या शाखामध्ये सीसीटीव्ही व सशस्त्र सुरक्षारक्षक नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बँकेने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने विभागीय सहनिबंधक कार्यालयाने त्यांच्या दि.२९/०९/२०१५ च्या पत्रान्वये त्रुटी पूर्ततेकरीता बँकेस कळविले आहे. बँकेकडून सुधारित प्रस्ताव सादर झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी मन्नेरवारलू व कोळी महादेव जमातीबाबतीत घेण्यात येणारी पक्षपाती भुमिका**

**(५) ३२२३७ (२२-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यमान आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून आदिवासी मन्नेरवारलू व कोळी महादेव जमातीवर होत असलेल्या घटनाबाह्य बेकायदेशीर व पक्षपाती कृतीची चौकशी करुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तसेच मा.आदिवासी मंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पडताळणी समित्यांचे कामकाज महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणी विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र. २३) व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारित केलेले "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३" मधील तरतुदीनुसार चालते. त्यानुसार प्रत्येक समितीमध्ये आयुक्तांसह एकूण पाच सदस्य असतात. प्रत्येक प्रकरणी समितीचा निर्णय हा या सदस्यांच्या बहुमताने घेण्यात येत असल्याने आयुक्त कोणत्याही विशिष्ट जमातीसाठी वैयक्तिक पातळीवर पक्षपाती वा बेकायदेशीर भुमिका घेत असल्याचे म्हणणे गैरलागू ठरते

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील धनगर या जातीस अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(६) ३३९५७ (२२-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर व हटकर ही जात आदिम जातींपैकी एक असून केंद्र शासनाकडील धनगड व धनगर केवळ “ड” व “र” या शब्दाच्या उच्चारामुळे राज्यातील धनगर या जातीस

अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित रहावे  लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य घटनेनुसार या जातीस अनुसूचित जमातीच्या सवलती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने या जातीचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२७-१०-२०१६) :** (१) धनगर व तिच्या तत्सम जातीपैकी हटकर यांचा समावेश भटक्या जमाती (क) च्या यादीत अ.क्र. २९ वर आहे. अनुसूचित जमातीच्या यादीत अ.क्र. ३६ वर ओरॉन, धनगड अशी नोंद आहे.

(२) व (३) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना संशोधन करुन  अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेकडून सदर संशोधन तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यापैकी संशोधनाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत (Formative Research) चे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित टप्प्यातील मुख्य संशोधनाचे भाग-१ व भाग-२ मधील संशोधनाचे काम पुर्ण करुन अंतीम अहवाल माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल, असे टाटा इन्सिस्टटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी शासनास कळविले आहे. तद्नुसार संस्थेचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

---

## राज्यातील मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(७) ३४४७१ (१८-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचारधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, मराठा, मुस्लिम तसेच धनगर समाजाच्या नागरीकांना आरक्षण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गांतर्गत १६ टक्के आरक्षण देण्याकरीता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दि.१५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दि.१४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने अतरिम स्थगिती दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

तसेच मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याकरीता दि.०९/०७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१४ काढण्यात आला व दि.१९/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मुस्लिम समाजाकरीता विशेष मागास प्रवर्ग-अ तयार करुन ५ टक्के आरक्षण देण्यात आले. मा.उच्च न्यायालयाने सदर अध्यादेशास स्थगिती दिल्यामुळे मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

धनगर आरक्षणासंदर्भात टाटा इन्सिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्याकडून संशोधन अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच उचित कार्यवाही केली जाईल.

(२) व (३) मराठा व मुस्लिम सामाजास आरक्षण देण्याबाबतच्या अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

धनगर आरक्षणासंदर्भात अगोदरच अनुसूचित जमातीत समावेश असलेली “धनगड” हि जमात व “धनगर” हे एक आहेत किंवा कसे, याबाबत टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्याकडून संशोधन करण्यात येत असून अंतिम अहवाल डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल असे त्या संस्थेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीयकृत बँकेकडून पीक कर्ज मिळण्याबाबत

**(८) ३५१३४ (२२-१२-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना एक लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी दिले जाते मात्र या योजनेचा फायदा राष्ट्रीयकृत बँकेकडून पीक कर्ज घेणा-यां शेतक-यांना मिळत नसल्याचे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत एक लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज घेणा-यां शेतक-यांना ३ टक्के व्याज सवलत दिली जाते व त्याची परतफेड राष्ट्रीयकृत बँकांसोबतच जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातूनही होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून बिनव्याजी कर्ज न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, हे पीक कर्ज राष्ट्रीयकृत बँकेकडून मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :** (१) नाही. हे खरे नाही. पिक कर्जची परतफेड विहित मुदतीत केल्यास राज्यातील शेतक-यांनी तीन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्जासाठी ३% दराने व्याज सवलत दिली जाते. सदर योजनेचा लाभ त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणा, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकांकडून पीक कर्ज घेणा-या आणि विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणा-या शेतक-यांना लागू केलेला आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पिक कर्जाची परतफेड विहित मुदतीत केल्यास रु.तीन लाखापर्यंतच्या पिक कर्जासाठी केंद्र शासनाकडून शेतक-यांना ३ % दराने व्याज सवलत दिली जाते. जसेच राज्य शासनाकडून डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत रु.एक लाखापर्यंतच्या पिक कर्जाची परतफेड शेतक-यांनी विहित मुदतीत (प्रतिवर्षी ३० जून पूर्वी) केल्यास शेतक-यांना ३% दराने व्याज सवलत दिली जात असून रु.एक लाखावरील परंतु रु.तीन लाखापर्यंतच्या पिक कर्जासाठी सदरची व्याज सवलत १ % दराने दिली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसुचित जमातींमधील काही जातींच्या गटांवर जात-प्रमाणपत्रे तपासण्याच्या पध्दतीमुळे होणा-या अन्यायाबाबत

**(९) ३५२६० (२३-१२-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसुचित जमातींमधील काही जातींच्या गटांवर जात-प्रमाणपत्रे तपासण्याच्या पध्दतीमुळे होणा-या अन्यायाबाबत मागासवर्गीय कृती समिती, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.४.६.२०१५ रोजीच्या सुमारास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पडताळणी समित्यांचे कामकाज “महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,

भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३)" व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारित केलेले" महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३" मधील तरतुदीनुसार चालते. प्रत्येक प्रकरणी समितीचा निर्णय हा या अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार घेण्यात येतो. सदर अधिनियम/नियमांत कोणत्याही विशिष्ट जमातीसाठी वेगळी तरतुद/नियम केलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील कापूस उद्योगाचे पुनरुत्थान आणि कापूस उत्पादक शेतक-यांच्या समृद्धीसाठी उपाय योजना करणेबाबत**

**(१०) ३६५७४ (२२-१२-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील एकंदर ८५ जिनींग प्रेसींग उद्योग असून गेल्या चार वर्षापासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतील वस्त्रोद्योग क्षेत्रातील मंदीच्या प्रभावामुळे आणि मराठवाड्यातील सध्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने जिनींग प्रेसींग उद्योग डबघाईस आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वॅट परताव्यातील जे-१-जे-२ मॅचिंगच्या अनुषंगाने मराठवाड्यातील कापूस उद्योजकांचे अर्धे अधिक भांडवल विक्रीकर खात्याकडे पडून असल्याने हे उद्योजक आर्थिक कोंडीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील कापूस उद्योगांचे पुनरुत्थान आणि कापूस उत्पादक शेतकरयांच्या समृध्दीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-११-२०१६) :** (१) परभणी जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये एकूण ६९ जिनिंग फॅक्टरी असून दुष्काळामुळे कमी कापूस आवकमुळे २५ जिनिंग फॅक्टरी बंद आहे

(२) जे-१ व जे-२ मॅचिंग होत नसल्यामुळे जिनिंग व्यापा-यांनी परताव्याकरीता रु. ४.५५ कोटी रक्कमेचा दावा केला आहे. या दाव्याचे तपासणीचे काम विक्रीकर विभागात सुरु आहे.

(३) केंद्र शासनाने जाहीर केलेल्या हमी दराप्रमाणे सी.सी.आय. मार्फत कापूस खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनामार्फत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर थकीत कर्जातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत**

**(११) ४०९५० (२७-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्त असलेल्या नाशिक जिल्ह्यातील सक्तीची कर्जवसुली तातडीने थांबवावी अशी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सक्तीच्या कर्जवसुलीकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे नाशिक जिल्हा सहकारी बँकेने पाठविलेल्या जप्तीपूर्वीच्या अंतिम नोटीसीमुळे दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर थकीत कर्जातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची करणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१२-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक ही बँक कर्ज वसुलीसाठी कोणत्याही शेतकरी सभासदाकडे सक्तीची वसूली करणेबाबत तगादा लावत नसून बँकेमार्फत कर्ज घेतलेल्या व सक्तीच्या वसूलीच्या कारणाने नाशिक जिल्ह्यातील कोणत्याही शेतकरी सभासदाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे मृत्यू झालेला नाही.

(३) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक या बँकेचे पीक कर्ज पुनर्गठनासाठी खरीप २०१५ मधील थकबाकीदार व पुनर्गठनास पात्र असलेल्या ६९७७ शेतक-यांपैकी ६४१२ शेतक-यांच्या रु.३८०२.४३ लाख इतक्या रकमेचे पुनर्गठन करण्यात आलेले आहे.

तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सन २०१५-१६ मध्ये २२४५२१ शेतकरी सभासदांना रक्कम रु.१६३२.२५ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्याबाबत**

**(१२) ४४४८७ (२०-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य जन जाती सल्लागार समितीच्या ४८ च्या बैठकीमध्ये आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात असलेल्या

कायद्याची तपासणी करुन महाराष्ट्र जमिनी महसूल संहिता, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी नेमलेल्या अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :** (१) होय,

प्रश्नाधिन समितीचे अध्यक्ष, तत्कालिन प्रधान सचिव (महसूल) श्री.एस.एस.संधू यांनी दिनांक १८ मे, २०१५ रोजी आदिवासी विकास विभागाकडे अहवाल सादर केलेला आहे.
(२) तत्कालिन प्रधान सचिव (महसूल) श्री.एस.एस.संधू यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ओडीसा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड या राज्यांच्या कायद्यातील संबंधित तरतूदी, विविध अभ्यास गटांच्या शिफारशी, समितीच्या बैठकांमध्ये वेळोवेळी झालेली चर्चा इत्यादी बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र राज्यातील आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या हस्तांरणावर सरसकट बंदी न आणता अनुसूचित क्षेत्रात काही प्रकार वगळता बिगर आदिवासींच्या लाभात हस्तांतरणावर बंदी आणण्यात यावी. हे करताना सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणांद्वारे काही अधिकचे निर्बंध टाकून राज्यभरात हस्तांतरणाची परवानगी देण्याची प्रक्रिया सुरु ठेवण्यात यावी. असे अभिप्राय अभ्यास समितीने नमूद केले आहेत. सदर अभिप्रायाच्या पार्श्वभूमीवर आदिवासींच्या जमीनीचे हस्तांतरण आणि त्यानुषंगाने आदिवासींच्या हितांच्या संरक्षणासाठी समितीने विविध शिफारशी केलेल्या आहेत.
(३) व (४) प्रस्तुत अहवालामध्ये सुचविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सूचना / अभिप्राय शासनास कळविण्याबाबत दि.२४ जून, २०१६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जनजाती सल्लागार परिषदेच्या मा.सदस्यांना विनंती करण्यात आली आहे. मा.सदस्यांकडून सूचना / अभिप्राय शासनास अप्राप्त आहेत. त्यामुळे शासन स्तरावर याप्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातशासकीय आश्रमशाळांचे बांधकाम व समांतर सुविधा अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३) ४५५१० (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यात एकूण ११ शासकीय आदिवासी मुलामुलींची शासकीय आश्रमशाळा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी ५ आश्रमशाळांचे बांधकाम व समांतर सुविधा पुरविण्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच पांगम आश्रमशाळेचे बांधकाम मागील ३ वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहे, मात्र भाडयाच्या घरात सुरु असलेली आश्रमशाळा स्थलांतरीत केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

साक्री (जि.धुळे) तालुक्यात एकूण ११ शासकीय आश्रमशाळा नसून एकूण १२ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत.
(२) शासकीय आश्रमशाळा सुकापूर, वार्सा, राईनपाटा, उमरपाडा व शिरसोले ता. साक्री या ५ या आश्रमशाळांचे बांधकाम माहे जानेवारी ते फेब्रुवारी २०१६ अखरे पूर्ण झालेले असून सदर इमारती ताब्यात घेतलेल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे,
पांगण आश्रमशाळेचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. परंतु पाण्याची सोय नसल्यामुळे व इमारतीत किरकोळ कामांची अपूर्णता असल्यामुळे सदर इमारत ताब्यात घेतली जात नाही.
(४) व (५) साक्री तालुक्यातील एकूण १२ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी १० शासकीय आश्रमशाळा ह्या शासकीय इमारतीमध्ये सुरु असून चरणमाळ आश्रमशाळेसाठी खाजगी जमीन मिळणेसाठी कार्यवाही सुरु असून विहीरगांव आश्रमशाळेसाठी जमीन प्राप्त असून अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याचे कार्यवाहीत आहे.

---

## नागपुर जिल्हयातील आदिवासी बहुल तालुक्यात वनहक्क अंतर्गत आदिवासी विभागात शेकडो अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ४५५७८ (२९-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर जिल्हयातील रामटेक, उमरेड, पारशिवनी, मौदा भिवापुर या आदिवासी बहुल तालुक्यात वनहक्क कायद्यातंर्गत आदिवासी विभागात शेकडो अर्ज प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे अहो काय,
(२) असल्यास, याबाबत शासनने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :**
(१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, वनहक्क कायदा, २००६ अंतर्गत रामटेक तालुक्यातील ६८, उमरेड तालुक्यातील ४९, पारशिवनी तालुक्यातील ७२, मौदा तालुक्यातील २३ तर भिवापूर तालुक्यातील ११ वैयक्तिक वनहक्क दावे जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आहेत.

सदरील प्राप्त झालेले सर्व वैयक्तिक वनहक्क दावे जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्पातंर्गत लाभार्थी योजनेपासून वंचित राहिल्याबाबत**

**(१५) ४५८९३ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)धुळे आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्पातंर्गत सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात आदिवासी सुशिक्षीत बेरोजगार व अन्य लाभार्थ्यांना शिलाई मशीन देणे, कॅमेरा, संगणक देणे, व्हिडीगो शुटींग कॅमेरे देणे इत्यादी व्यक्तीगत लाभाच्या योजना मंजूर करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच ब-यांच लाभार्थ्यांकडून त्यांनी भरावयाची रक्कम देखील भरुन घेण्यात आली आहे उदा. संगणकासाठी लाभार्थ्यांना ८००० रु. मात्र संबंधित लाभार्थ्यांना त्यायोजनेचा अद्याप प्रत्यक्षात लाभ देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित ठेवण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-१०-२०१६) :**(१) सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षात आदिवासी लाभार्थ्यांना व्हिडीओ शुटींग कॅमेरा देणे व संगणक पुरवठा करणे ही योजना मंजूर नाही. तथापि, शिलाई मशिन पुरवठा ही योजना मंजूर करण्यात आली आहे.
(२) व (३) आदिवासी लाभार्थ्यांना व्हिडीओ शूटींग कॅमेरा देणे,संगणक पुरवठा करणे ही योजना सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात मंजूर नसल्याने कोणत्याही आदिवासी लाभार्थ्यांकडून १५% आर्थिक सहभागाची रक्कम प्रकल्प अधिकारी धुळे यांनी भरुन घेतलेली नाही. मात्र, शिलाई मशिनसाठी ८५% अनुदानासाठी १७ लाभार्थ्यांकडून प्रत्येकी १५% आर्थिक सहभाग रुपये १५००/- भरुन घेण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील दलित वस्त्यातील अनुसूचित जाती जमातीच्या सवलतीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१६) ४९६८८ (३०-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत जिल्हयातील दलित

वस्त्यातील अनुसूचित जाती जमातीच्या सवलतीकरणासाठी देण्यात येणा-यां निधीमध्ये जिल्हा परिषदेच्या चुकीच्या प्रस्तावामुळे राहता तालुक्यातील १३ गावांचा ५५ लाखांचा निधी गेल्या ७ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-११-२०१६) :**(१), (2) व (३) हे खरे नाही. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास करणे या योजनेंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात राहता तालुक्यातील (जि.अहमदनगर) रुपये ६२६.०० लक्ष रकमेची १४४ कामे मंजूर केली होती. त्यापैकी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहता यांनी १३ कामांमध्ये बदल करावयाचा प्रस्ताव सादर केला होता. सदर १३ कामांना रुपये ६४.०० लक्ष रक्कम मंजूर होती.

उपरोक्त १३ कामांपैकी ०४ कामे पूर्ण, ०२ कामे प्रगतीपथावर, ०४ कामे अद्याप सुरु झालेली नाहीत व बृहतआराखड्यात नसलेली ०३ कामे रद्द करण्यात येत आहे. सदर १३ कामांपैकी ११ कामांना निधी वर्ग करण्यात आलेला असून ०२ कामांना तांत्रिक कारणास्तव निधी वर्ग करण्यात आला नाही. त्यामुळे निधी वितरणाची कार्यवाही प्रलंबित नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांना पहिलीच्या वर्गातच जातीचे दाखले देण्याबाबत**

**(१७) ५०४५२ (२८-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना पहिलीच्या वर्गातच जातीचे दाखले देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत निर्णय घेण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर योजना तपासण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत मातंग समाजासाठी असलेला निधी अन्य कारणासाठी वापरल्याबाबत**

**(१८) ५३७६६ (२०-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत तत्कालीन सरकारच्या नेत्यांच्या शिफारशींवर कोट्यावधी रुपयांचे कर्ज वाटप केले गेले व मातंग समाजासाठी असलेला हा निधी त्यांच्यासाठी न वापरता तत्कालीन सरकारच्या नेत्यांनी सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी वापरला, या आर्थिक अपहाराची चौकशी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतीनीधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राव्दारे दि.१५/०४/२०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रामध्ये तत्कालीन सरकारच्या कोण-कोणत्या आमदार, खासदार व नेत्यांची नावे नमुद करण्यात आली आहेत व तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-११-२०१६) :** (१) होय.

(२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणांचा तपास त्वरेने पूर्ण करण्याबाबत गृह विभागाकडून त्यांच्या दिनांक १५ जुलै, २०१६ च्या पत्रान्वये राज्य गृह अन्वेषण शाखा, महाराष्ट्र राज्य यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील राष्ट्रीयीकृत बँका शेतक-यांना कर्ज देताना सर्च रिपोर्ट आणि थकबाकी नसल्याच्या दाखल्याची मागणी करून अडवणूक करत असल्याबाबत**

**(१९) ५४१५४ (२२-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील राष्ट्रीयीकृत बँका शेतक-यांना कर्ज देताना सर्च रिपोर्ट आणि थकबाकी नसल्याच्या दाखल्याची मागणी करून अडवणूक करत असल्याचा प्रकार माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील राष्ट्रीयीकृत बँकांनी आतापर्यंत शेतक-यांना अवघे (१०) टक्के कर्जवाटप केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही. दिनांक २३.०९.२०१६ अखेर पुणे जिल्ह्यामध्ये राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत पीक कर्जाचे वितरण जवळपास ७० % इतके झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात साखर उत्पादनात यंदा मोठी घट झाली असल्याबाबत**

**(२०) ५५६१७ (२२-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ एप्रिल, २०१६ अखरे ८३.६० लाख टन साखर उत्पादन झाले आहे ते गतवर्षी या कालावधीत झालेल्या उत्पादनापेक्षा १६ लाख टनांनी कमी झाले असल्याचे व त्यामुळे साखरेचा भाव प्रतिकिलो ५० रूपयांवर जाण्याची शक्ता असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सखरेचे भाव नियंत्रणात ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखाने दुष्काळी परिस्थितीतून जात असल्याने त्यांना उभारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-११-२०१६) :** (१) सन २०१५-१६ हंगामात एप्रिल अखेर ८३.६० लाख टन साखर उतपादन झाले होते. हंगाम अखेर एकूण साखर उत्पादन ८४.१८ लाख टन झाले असून सन २०१४-१५ हंगामाच्या तुलनेनी २०% कमी उत्पादन झालेले आहे. एप्रिल २०१६ मध्ये राज्यात साखरेचा सरासरी दर रु.३२००/- प्रति क्विंटल होता.

(२) साखरेचे भाव नियंत्रणात राहणेकरीता केंद्र शासनाने दि.२९.४.२०१६ च्या अधिसुचनेद्वारे साखरेच्या साठ्यावर ५००० क्विंटलची मर्यादा निश्चित केलेली आहे. तसेच भाव नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र शासनाने दि.८.९.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे साखर उत्पादकाकडील साखर साठ्यावर माहे सप्टेंबर २०१६ अखेर ३७% आणि माहे ऑक्टोंबर २०१६ अखेर २४% साठ्याचे निर्बंध घालण्यात आले आहेत.

(३) राज्यातील काही साखर कारखारन्यांनी कर्जाचे फेररचना करणेबाबत विनंती केल्यानुसार प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदय यांचे स्तरावरुन दि.३१.०३.२०१६ चे पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे. ऊस खरेदी कराबाबत शासन राजपत्र दि.२६.०४.२०१६ नुसार हंगाम २०१५-१६ मधील ऊस खरेदीकर माफ केलेला आहे.

हंगाम २०१४-१५ ची FRP देणेकरीता केंद्र शासन अधिसूचना दि.२३.०६.२०१६ चे धर्तीवर शासनाने, शासन निर्णय दि.३०.०७.२०१५, ५.०९.२०१५, ९.१२.२०१५ व २१.०४.२०१६ अन्वये सॉफ्ट लोन योजना जाहीर केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागातर्फे आश्रमशाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२१) ५५६९५ (१२-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागातर्फे आश्रमशाळांमधील रिक्त पदे भरण्यात येणार असल्याचे राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांनी घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोगस आदिवासी दाखल्यांचा प्रश्न समूळ सोडविण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहितीही आदिवासी विकास मंत्री यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिली, हे ही खरे आहे काय,

(३) याबाबत कोणती स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे वा येत आहे, त्याबाबतचा तपशील काय आहे,

(४) तसेच प्रश्न भाग (१) मधील नमूद आश्रमशाळांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**

(१) होय, नियमानुसार रिक्त पदे भरण्याबाबत मा.मंत्री आदिवासी विकास यांनी निर्देश दिले आहेत.

(२) होय. हे खरे आहे.

(३) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीच्या कामाकजारिता “आदी प्रमाण” ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली असून सदर प्रणाली दि.०१ मे, २०१६ पासून राजयभरात कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

(४) आश्रमशाळांमधील गट-क (शिक्षक व शिक्षकेत्तर) संवर्गातील रिक्त पदे भरण्यातबाबत अपर आयुक्त स्तरावर व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत प्रकल्प कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**काझड (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील शेतक-यांने युको बँकेच्या कर्ज वसुलीच्या तगाद्यामुळे आत्महत्या केल्याबाबत**

**(२२) ५६३४३ (२२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काझड (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील शेतक-यांने युको बँकेच्या कर्ज वसुलीच्या तगाद्यामुळे दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतक-यांचा दशक्रिया विधी दिनांक ३ मे, २०१६ रोजी युको बँकेच्या बारामती शाखेच्या दारातच करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना मध्यमुदत कर्जावर १२ ते १४ टक्के व्याज दर आकारण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांना मध्यमुदत कर्जासाठी ६ टक्के व्याजदर आकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याचे कारण काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार तसेच युको बँकेच्या नियमानुसार मध्यम मुदत कृषी कर्जावरील सध्याचे व्याजाचे दर २५ लाखापर्यत १०.७०% व २५ लाखावरील कर्जास ११.७०% आहेत.

(४) शासनाच्या धोरणानुसार अल्पमुदत पीक कर्जावर ६% दराने व्याज आकारणी करण्यात येते मात्र मध्यम मुदत कर्ज हे बँका त्यांच्या स्वनिधीतून वाटप करीत असल्याने संबंधित बँकांच्या कर्ज वितरण धोरणानुसार व्याजाचे दर आकारण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साखर कामगारांचा वेतन वाढीबाबतचा प्रस्ताव**

**(२३) ५६५०७ (२२-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कामगारांचा वेतन वाढीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, साखर कामगारांना वेतनवाढ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-११-२०१६) :** (१) होय.

(२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन निर्णय दिनांक ८ जुलै, २०१५ अन्वये राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी त्रिपक्षीय समिती नव्याने गठीत करण्यात आली आहे. सदर समिती साखर कामगारांचे वेतन निश्चिती, वेतनवाढ,भत्ते विविध सवलीती इत्यादी मागण्यांचे अनुषंगाने शिफारस अहवाल उद्योग, उर्जा व कामगार विभागास सादर करते.

(३) व (४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन निर्णय दिनांक ८ जुलै, २०१५ अन्वये राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या त्रिपक्षीय समितीने दिनांक ०४ जुलै, २०१६ रोजी सर्वानुमते साखर कामगारांच्या वेतनवाढीबाबत कराराच्या शिफारशी सादर केलेल्या आहेत.

सदर समितीने सादर केलेल्या शिफारशी व अहवाल मा. मंत्री (कामगार) व मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

---

**राज्यातील उस उत्पादकांना रास्त व किफायतशीर भावांपैकी (एफआरपी) ८० टक्के रक्कमही न देणा-यां साखर कारखान्यावर कारवाई करण्याबाबत**

**(२४) ५६५५२ (२२-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उस उत्पादकांना रास्त व किफायतशीर भावांपैकी (एफआरपी) ८० टक्के रक्कमही न देणा-यां १९ साखर कारखान्यावर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-११-२०१६) :** (१) व (२) राज्यातील साखर कारखान्यांना देय FRP रक्कमेच्या ८०% प्रमाणे देयके अदा करणेबाबत शासनाने कोणतेही आदेश काढलेले नाहीत. शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी व साखर कारखान्यांचे प्रतिनिधी यांची मागील हंगामामध्ये बैठक होवून त्यामध्ये सामंजस्यने FRP ची ८०% प्रमाणे देयके अदा करणेबाबत उभयपक्षात ठरले. त्यानुसार कारखान्यांनी कार्यवाही केलेली आहे. तथापि हंगाम २०१५-१६ मधील मधील थकीत FRP संदर्भात १३ साखर कारखान्यांर ऊस नियंत्रण आदेश, १९६६ च्या तरतुदीनुसार दि.१५.८.२०१६ अखेर रु.१६४.५२ कोटी रक्कमेचे RRC आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे निर्गमित करण्यात आले असून १७ साखर कारखान्यांचे हंगाम २०१५-१६ चे गाळप परवाने रद्द करुन रु.१८३.८९ कोटी रक्कमेचे दंडाचे आदेशही निर्गिमित केलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील कापड गिरण्यांची जमीन विक्री आणि विकास करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत**

**(२५) ५६६२१ (२२-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कापड गिरण्यांची जमीन विक्री आणि विकास करण्याकरिता तत्कालीन सरकारने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समितीची मुदत संपली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीला मुदत वाढ देण्याच्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. सुभाष देशमुख (१०-११-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सदर सनियंत्रण समितीच्या अध्यक्षांची मुदत दि.२८.९.२०१४ रोजी संपली होती. तथापि दि.७.५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सनियंत्रण समितीच्या अध्यक्षांना दि.२८.९.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव यासारख्या वस्त्रोद्योग केंद्रात परराज्यातील सूताची मोठया प्रमाणात आवक होत असल्याबाबत**

**(२६) ५८४१० (२२-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव यासारख्या वस्त्रोद्योग केंद्रात परराज्यातील सूताची मोठया प्रमाणात आवक होत असून केंद्रिय विक्री कर भरुन आणलेले सूत १५ दिवसांत संबधित कारखन्यांला विक्री करण्याचे बंधन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीएसटीचा आधार घेऊन अवाढव्य साठा करण्याचा आणि त्यांची मुदतबाहय विक्री करण्याचा प्रकार नियमितपणे सुरु असल्याचे दिसून येत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाला कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१०-२०१६) :** (1) नाही.

(२), (३), (४) आणि (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय योजनांपासून लाभार्थी वंचित असल्याबाबत**

**(२७) ५८८२३ (२०-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून राबविण्यात येणा-यां इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना सदर योजनेत लाभार्थीना आर्थिक लाभ मिळण्यास विलंब होत असल्यामुळे आर्थिक लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंसाठी शासनाकडून लाभार्थ्यांना मिळणारे पैसे संबंधित विभागाकडे वेळेवर जमा होत नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय योजनांपासून लाभार्थी वंचित राहू नये म्हणून लाभार्थ्यांना वेळेवर पैसे मिळण्यासाठी शासनाने चौकशी करून कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करीत आहे,

(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय ? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-११-२०१६) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

विशेष सहाय्य कार्याक्रमातंर्गत राबविण्यात येणा-यां योजनाना निधीची कमतरता पडू नये यासाठी या सर्व योजनाची देयक ऊणे पध्दतीवर सादर करण्याची सुविधा जिल्हयाना देण्यात आलेली आहे. त्यामुळे निधी अभावी एकही लाभार्थी वंचित राहणार नाही. याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

(३) व (४) विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्याना दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात अर्थसहाय्य/निवृत्तीवेतनाचे वाटप करण्यात यावे. असे निर्देश शासन निर्णय दि.२६ ऑक्टोंबर, २०१० नुसार देण्यात आलेले आहेत. तसेच तात्कालीन मा.मंत्री (विशेष सहाय्य) यांनी दिनांक २९ जुलै, २०११ रोजीच्या पत्रान्वये त्याच प्रमाणे मा. मुख्य सचिवांनी देखील दिनांक ३ सप्टेंबर, २०११ रोजीच्या पत्रान्वये लाभार्थ्याना कोणत्याही परिस्थितीत दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात अर्थसहाय्य/निवृत्तीवेतनाचे वाटप करण्यात यावे व जे तहसिलदार अशा पध्दतीने वाटप करणार नाहीत, त्याचे विरुध्द सक्त कारवाई करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. तसेच विभागाच्या सचिवांनी सर्व जिल्हाधिका-यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी लाभार्थ्याना कोणत्याही परिस्थितीत दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात निवृत्तीवेतनाचे वाटप करण्याचे आदेश दिले आहेत.

---

**राज्यातील प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सन २०१९ पर्यंत राज्य शासनाकडून घर बांधून देण्याबाबत**

**(२८) ५९३०८ (१२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सन २०१९ पर्यंत राज्य शासनाकडून घर बांधून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी निधीची तरतूद व इतर खर्चाचे नियोजनही झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय झाला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे तसेच त्याची अंमलबाजावणी केव्हापासून होणार आहे,

(४) या प्रस्तावावर अद्याप निर्णय घेतला नसल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

शासन पत्र क्र. बैठक २०१५/प्र.क्र.१२१/शिकाना/का-१६, दिनांक १४ डिसेंबर, २०१५ अन्वये आदिवासी अनुसूचित जमातीच्या सर्व लाभार्थ्यांना सन २०१९ पर्यंत घरे बांधून देण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली नोव्हेंबर, २०१५ व फेब्रुवारी २०१६ मध्ये बैठक संपन्न झाली.

(२) सन २०१५-१६ पासून आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या शबरी आदिवासी घरकुल योजना, पारधी घरकुल योजना व आदिम जमाती घरकुल योजनांचा निधी राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई यांचे स्तरावर वर्ग करण्यात आला आहे.

प्रति लाभार्थी रक्कम १.०० लक्ष प्रमाणे शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लक्षांक सन २०१५-१६ व सन २०१६-१७ अनुक्रमे ७००० व १४००० घरकुल लक्षांक लोकसंख्या नुसार जिल्हा निहाय ठरवून देण्यात आलेला आहे.

तसेच सन २०१५-१६ करीता पारधी घरकुल योजनेचा लक्षांक १४५५ व आदिम जमाती करिता १४०० लक्षांक लोकसंख्या नुसार जिल्हा निहाय ठरवून देण्यात आलेला आहे.

(३) शासन निर्णय आ.वि.वि घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७ दिनांक १५ मार्च, २०१६ अन्वये अनुसूचित जमाती लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील सहकारी संस्था, साखर कारखाने व सहकार न्यायलय या कार्यालयातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२९) ५९३२७ (२२-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील सहकारी संस्था, साखर कारखाने व सहकार न्यायलय या कार्यालयाचा भार केवळ ३१४ कर्मचा-यांवर असून वर्ग ३ ची १४८ पदे, कनिष्ठ लिपिकांची ४७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-११-२०१६) :**(१) होय अंशत: खरे आहे.

कोल्हापूर विभागात कोल्हापूर, सांगली व सातारा हे जिल्हे असून कोल्हापूर विभागास वर्ग-३ ची एकूण ३५४ पदे मंजूर आहेत. सद्यस्थितीत सदर पदांपैकी २०० पदे भरलेली असून १५४ पदे रिक्त आहेत.

(२) नियमित सेवा निवृत्ती, कर्मचा-यांची विभाग बदली तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ जून, २०१५ नुसार सरळसेवा भरतीवर नियंत्रण आल्यामुळे सदरची पदे रिक्त राहिली आहेत.

(३) शासन पत्र दिनांक १० ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यातील गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदांच्या ५० टक्के भरती करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे, त्यानुसार सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) लागू नाही.

---

**राज्यातील वस्त्रोद्योग व्यवसाय आर्थिक अडचणीत सापडल्याबाबत**

**(३०) ५९५६७ (२२-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची १८०० कोटी रुपयांची गुंतवणूक असलेला आणि प्रतिवर्ष ४०० कोटी रुपयांचे कर रुपाने उत्पन्न देणारा वस्त्रोद्योग व्यवसाय वाढते वीजदर, कापूस व सूत दरवाढ तफावत, शॉट मार्जीन यामुळे सध्या आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वस्त्रोद्योग व्यवसाय या आर्थिक अडचणीतून वर काढण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) ऊद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.२९.६.२०१६ अन्वये विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना इंधन समायोजन आकारात अनुक्रमे ४० पैसे, ३० पैसे व २० पैसे प्रति यूनिट इतकी सवलत देण्यात आलेली आहे. वस्त्रोद्योग धोरणांतर्गत दि.३१.३.२०१६ पर्यंत राज्यातील ५८२ वस्त्रोद्योग घटकांना रु.१६९.२७ कोटी व्याज अनुदान तथा विदर्भ, मराठवाडा तथा उत्तर महाराष्ट्रातील १८८ वस्त्रोद्योग घटकांना सुमारे ९४.९० कोटी १०% भांडवली अनुदान देण्यात आलेले आहे. सहकारी सुतगिरण्यांचा प्रकल्प अहवाल ५:४५:५० याप्रमाणे मंजूर असून प्रकल्प अहवालानुसार सहकारी सुतगिरण्यांनी जमा केलेल्या सभासद भागभांडवलाचे ९ पट शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक व कळवण येथील साठवण बंधा-यांच्या कामास**
**अंदाजपत्रकीय मान्यता देण्याबाबत**

**(३१) ५९५९१ (१२-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी यांनी आदिवासी विकास विभागाचे उपसचिव व आदिवासी विकास आयुक्त यांना पत्राद्वारे नाशिक व कळवण येथील साठवण बंधा-यांच्या कामास अंदाजपत्रकीय मान्यता देण्याचे आदेश दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अंदाजपत्रकीय कामाला ६ कोटी २५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर असल्याचे व सदर कामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्याचे सदरील पत्रामध्ये स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसास काय कार्यवाही केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील नाशिक व कळवण प्रकल्प कार्यालयांतर्गत बंधा-यांच्या कामाकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर ६.२५ कोटी निधीपैकी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, नाशिक अंतर्गत १५ बंधा-यांच्या रु.३.५० कोटी निधीच्या कामांच्या अंदाजपत्रकांना दि.२०.४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर कामांची अंमलबजावणी स्थगित करण्याबाबत मा.मंत्री आदिवासी विकास यांचे निर्देश असल्याचे मा.मंत्री महोदयांनी विशेष कार्यकारी अधिकारी यांनी पत्राद्वारे आदेश दिले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर कामासंबंधित मा.मंत्री आदिवासी विकास यांचे कार्यालयाकडून कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच विभागाकडे किंवा आयुक्त आदिवासी विकास यांचेकडे याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विभागातील पेसा कायद्याचा निधी पडून असल्याबाबत**

**(३२) ५९७८२ (१२-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या विकासासाठी राज्य शासनाने पेसा कायदा आमलात आणला असतानाही त्या कायद्याची माहिती व जनजागृती तळागाळापर्यंत पोहचली नसल्यामुळे पालघर जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यांतील ग्रामपंचायतीचा लाखोंचा निधी बँक खात्यात पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार (जि.पालघर) येथे या कायद्यांतर्गत ग्रामपंचायतीच्या बँक खात्यामध्ये केंद्र सरकारकडून जमा झालेला ४२ कोटी ५२ लाख रुपयांचा निधी गेल्या सहा महिन्यांपासून गावांचा विकास आराखडा तयार करण्यात न आल्याने अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्र. १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पेसा कायद्याच्या पैशांचा विकासकामांत वापर होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-११-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखर कारखान्यांनी शेतक-यांना हंगाम २०१५/१६ मधील एफ.आर.पी तील ४५ रुपये प्रतिटन कपात करुन ऊस बिल अदा केल्याबाबत**

**(३३) ५९९९५ (२२-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण**

**विखे-पाटील (शिर्डी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखर कारखान्यांनी शेतक-यांना हंगाम २०१५/१६ मधील एफ.आर.पी तील ४५ रुपये प्रतिटन कपात करुन ऊस बिल अदा केल्याचे नुकतेच माहे जून,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीला साखरेचे दर वाढल्याने साखर कारखान्यांना मदतीची गरज नाही असे गृह धरुन केंद्र शासनाने साखरेच्या निर्यातीसाठी प्रतिटन जाहिर केलेले ४५ रुपये अनुदान रद्द केल्याची बाब मे, २०१६ मध्ये वा त्यादाम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे साखर कारखान्यासमोर अडचणी वाढल्या असल्याने साखर कारखान्यांना उसाला एफआरपी नुसार दर देता येणे शक्य नाही, तसेच वरील निर्णयामुळे राज्यातील साखर कारखान्यांना ३०० कोटी रुपये फटका बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्राने एकूण साखर उत्पादनाच्या ११ टक्के साखर निर्यात केल्यानंतर हे अनुदान दिले जाईल असे जाहीर केले आहे. त्याप्रमाणे कोल्हापूर, सांगली जिल्हयातील साखर कारखान्याना साखर निर्यात करुन अनुदान देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, कोल्हापूर वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याने एफआरपीपेक्षा कमी दराने दुस-या हप्त्याची बिले काढल्याने दि.६/६/२०१६ रोजी वा त्या सुमारास स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी साखर सह संचालक कार्यालयावर मोर्चा काढला होता, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील साखर कारखान्यांनी हंगाम २०१५-१६ मधील एफआरपी देयके केंद्र शासनाने जाहीर केलेले साखर निर्यात अनुदान रु.४५/- प्रति टन राखून ठेवून ऊस पुरवठादार शेंतक-यांना अदा केलेली आहे. याबाबत साखर आयुक्त कार्यालयाने दि.१२.९.२०१६ चे पत्राने एफआरपी प्रमाणे संपूर्ण देयके तात्काळ अदा करणेसाठी सूचित केले आहे.

(२) हे खरे आहे.

केंद्र शासनाने साखरेच्या निर्यातीसाठी प्रति टन जाहिर केलेले ४५ रुपये अनुदान दि.१९.५.२०१६ रोजी रद्द केलेले आहे.

(३) नाही.

सद्यःस्थितीत साखरेचे भाव रु.३१००-३३०० प्रति क्विंटल इतके असल्याने साखर कारखान्यांना ऊसाला एफआरपीनुसार दर देता येणे शक्य आहे.

(४) दि.१८.९.२०१५ च्या केंद्र शासनाच्या पत्राप्रमाणे साखर कारखानानिहाय कमीत कमी १२ टक्के निर्यातीचा कोटा निश्चित केला आहे आणि प्रथमच गाळप हंगाम घेणा-या कारखान्यासाठी उत्पादनाच्या १२ टक्के साखर निर्यात उदिष्ट निश्चित केले आहे.

(५) व (६) होय.

थकीत एफ आर पी संदर्भात तात्यासाहेब कोरे वारणा कारखान्याची दि.०२.०२.२०१६, २९.२.२०१६,११.३.२०१६, २२.३.२०१६, १०.५.२०१६, ४.८.२०१६, ६.९.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. तसेच दि.१८.५.२०१६ व दि.२७.६.२०१६ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर सुनावणीमध्ये कारखान्यास थकीत रक्कमा शेतक-यांना तात्काळ अदा करण्याचे सूचीत करण्यात आले आहे. माहे जून २०१६ अखेर कारखान्याकडे रु.३१.९९ कोटी थकबाकी होती. ती दि.३१.८.२०१६ अखेर १५.३९ कोटी इतकी राहीलेली आहे. सदरची रक्कमही त्वरीत अदा करण्याची सूचना कारखान्यास देण्यात आलेली आहे. कारखान्याने हंगामातील एकुण देय एफआरपी रु.३२८.३४ कोटी रक्कम शेतक-यांना अदा केली आहे, त्याची टक्केवारी ९५.१५ टक्के इतकी आहे.

---

**आदिवासी विकास विभागाने नंदूरबारला चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द केली असून ही भरती प्रक्रिया रोजंदारी कर्मचा-यांवर अन्याय करणारी असल्याबाबत**

**(३४) ६००५८ (१२-०८-२०१६). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने नंदूरबारला चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द केली असून ही भरती प्रक्रिया रोजंदारी कर्मचा-यांवर अन्याय करणारी असल्याने प्रक्रिया रद्द करावी म्हणून रोजंदारी वर्ग तीन व चार कर्मचारी संघटनेने आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त संघर्ष समितीच्या मागण्याची दखल घेत शासनाने सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर जाहीरात नियमानुसार प्रसिध्द करण्यात आल्याने रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा शहरातील भिल्ल समुदाय विविध विकास योजनांपासून वंचित असल्याबाबत**

**(३५) ६०११५ (१२-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी भिल्ल समाजाची वस्ती आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिल्ल समुदाय हा आदिवासी वर्गात समाविष्ट असून त्यांना आदिवासींसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ दिला जातो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलडाण्यातील भिल्ल समाज शबरी विकास महामंडळ अंतर्गत दिल्या जाणा-या व घरकुल, शैक्षणिक शिष्यवृत्ती इत्यादी शासकीय योजनांपासून वंचित आहे, खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास महामंडळाने विविध योजनांद्वारे राज्यभरातील आदिवासी भागातून एकाधिकार धान खरेदी योजनेत खरेदी झालेला भात तुकडा किंवा कण्याच्या स्वरुपात मिळत असल्याबाबत

**(३६) ६०९१० (१२-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाने विविध योजनांद्वारे राज्यभरातील आदिवासी भागातून एकाधिकार धान खरेदी योजनेत खरेदी झालेला भात भरडाईसाठी मिलला पाठविल्यानंतर तपासणी यंत्रणा निष्क्रिय असल्याने सदरचा भात तुकडा किंवा कण्याच्या स्वरुपात मिळत असल्याची तक्रार संबंधित अधिका-यांकडे वारंवार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात वाहतूक कंत्राटदार आणि मिलमालकांची भूमिका संशयास्पद असून याबाबत सटाणा (जि.नाशिक) येथील दोन शासकीय कंत्राटदार जाबाबदार आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
आदिवासी विकास महामंडळाने विविध योजनांद्वारे एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत खरेदी झालेला धान, भरडाई झाल्यानंतर संबंधीत प्रकल्पस्तरीय समितीमार्फत तपासणी होवून योग्य प्रतीच्या तांदुळाचा पुरवठा गोदामातून थेट आश्रमशाळांना करण्यात आलेला आहे. पुरवठा झालेल्या तांदुळासंदर्भात संबंधीत शासकीय आश्रमशाळांकडून अथवा त्यांचे नियंत्रण अधिका-यांकडून लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) चौकशीचा प्रश्न येत नाही.
(४) विलंबाचा प्रश्न येत नाही.

---

**कल्याणनजिक (जि.ठाणे) मोहने परिसरात असलेल्या व बंद पडलेल्या एनआरसी कंपनीने वसाहतीतील नागरिकांचे पाणी आणि वीज बंद केल्याबाबत**

**(३७) ६०९८० (२२-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात कल्याणनजिक मोहने परिसरात असलेल्या व बंद पडलेल्या एनआरसी कंपनीने वसाहतीतील नागरिकांचे पाणी आणि वीज दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास बंद केल्याने रहिवाश्यांचे मोठया प्रमाणात हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज तोडल्याने व पाणी बंद केल्याने सदर वसाहतीतील महिलांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेवर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मोहने येथील एनआरसी वसाहतीतील नागरिकांना वीज, पाणी मिळावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१६) :** (१) होय.

ठाणे जिल्ह्यात कल्याणजनिक मोहने परिसात एनआरसी कंपनीमार्फत पाणी व वीज पुरवठा करण्यात येतो. एनआरसी कंपनीची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना असून कंपनी त्यांचे कॉलोनीमधील रहिवाशांना दैनंदिन पाणी पुरवठा करते.

एनआरसी कंपनीची वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बंद केल्याने दिनांक १८ एप्रिल, २०१६ च्या दरम्यान नागरिकांचे हाल झाले होते.

(२) होय.

(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यानी विनंती केल्यानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकाकडून काही दिवस टॅकरने पाणी दिले होते व सार्वजनिक स्टॅडपोस्ट दिले होते.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वीजपुरवठा पुर्ववत करुन दिला असून आजमितीस वीज पुरवठा सुरु आहे, व पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात वनहक्क ग्रामसभा पातळीवरील १५२९ दावे अमान्य करण्यात आले असल्याचे**

**(३८) ६१०९३ (२४-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात वनहक्कासाठी ग्रामसभा पातळीवर ३०८५ दावे प्राप्त झाले आहेत मात्र त्यापैकी १५२९ दावे अमान्य करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सर्वेक्षण करून सदर अमान्य दावे मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :**(१) अमरावती जिल्ह्यात वनहक्कासाठी ग्रामसभा पातळीवर ३१२४ दावे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी उपविभागास्तरीय समितीकडे ११९९ वैयक्तीक दावे अमान्य करण्यात आले आहेत. व जिल्हास्तरीय समितीकडील २९० दावे अमान्य करण्यात आले आहेत.

(२) उपविभागस्तरीय समितीने अपात्र ठरविलेले वैयक्तिक वनहक्क दावेदार, जिल्हास्तरीय समितीकडे अपिल दाखल करीत आहेत.

जिल्हास्तरीय समितीकडे दाखल झालेल्या वैयक्तीक वनहक्क अपिल प्रकरणांमध्ये जिल्हास्तरीय समिती स्तरावरुन प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औढा नागनाथ तालुक्यातील जलालदाभा येथील महिलांनी गावात दारुबंदीचा प्रयोग राबविलाबाबत**

**(३९) ६११२४ (२०-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा नागनाथ तालुक्यातील जलालदाभा येथील महिलांनी गावात दारुबंदीचा प्रयोग राबविला आहे परंतु काही मंडळाकडून छुप्या पध्दतीने दारुव्रिकी केली जात आहे. त्याविरोधात येथील महिलांनी मा.तहलिसदार यांची भेट घेऊन दारु विक्री करणा-यांना प्रतिबंध घालण्याची मागणी केली असल्याचे माहे जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर गावातील अवैध दारुविक्री करणा-यांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडून अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, हिंगोली कार्यालयास प्राप्त झालेल्या महिला मंडळाच्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १२.०९.२०१६ रोजी निरीक्षक, राज्य उत्पादक शुल्क, हिंगोली यांनी भरारी पथकासह महिला मंडळासोबत निवेदनात उल्लेखिल्या ठिकाणी जाऊन संशयित घराची झडती घेतली असता त्या ठिकाणी काहीही अवैध आढळून न आल्याने निरंक पंचनामे केले आहे. तथापि, पथकाने गावाच्या परिसरात अवैध मद्य विक्रीच्या दोन गुन्ह्यांची नोंद करुन एकूण रु. १६५०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीस अटक केली असून ७० लिटर रसायन नष्ट केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळा शिक्षकांचे वेतन तसेच देय अनुदान थकीत असल्या बाबत**

**(४०) ६१३४८ (२०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळांतील शिक्षकांचे वेतन थकीत असून शसनाने सन २०१५-१६ मध्ये वेतनासाठी १०० टक्के अनुदान वितरीत केले असले व एक तारखेला वेतन अदा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले असले तरी सोलापूर जिल्ह्यातील बहुतांशी आश्रमशाळेतील शिक्षकांना गेल्या ६ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याची वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या शिक्षकांचे थकीत वेतन देण्याबाबत त्वरीत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) तसेच शासनाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणीस दुर्लक्ष करणा-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. जुलै, २०१६ अखेरपर्यंत वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील निमसोड येथील सोनारसिध्द विकास सोसायटीत नविन पीककर्ज देताना शेतक-यांची अडवणूक करीत असल्याबाबत**

**(४१) ६१३५४ (२२-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील निमसोड येथील सोनारसिध्द विकास सोसायटीच्या निवडणूकीत काही सभासदांना शेतक-यांनी विरोध दर्शविल्यामुळे त्यांचे जुने पीककर्ज भरुन घेतले. मात्र नविन पीककर्ज देताना ऐन दुष्काळामध्ये शेतक-यांची अडवणूक करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बँकेच्या संचालक मंडळावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई येथे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या ऊस नियंत्रण मंडळाच्या बैठकीबाबत**

**(४२) ६१५१२ (२२-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस नियंत्रण मंडळाची बैठक राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथे पार पडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-११-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) ऊस नियंत्रण बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(१) दोन कारखान्यामधील हवाई अंतराची अट वगळणेबाबत ऊस नियंत्रण मंडळातील शेतकरी प्रतिनिधी यांचे अभिप्राय पुढील निर्णयास्तव शासनाकडे सादर करणे.

(२) आर्यन शुगर, बार्शी, जि.सोलापूर यांचेवर RRC कारवाई संदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा खुलासा मागविणे.

(३) ऊसतोडणी व वाहतूक दर निश्चित करणेकरीता गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी बाबत निर्णय घेणेकरीता ऊस नियंत्रण मंडळाची विशेष बैठक आयोजित करणे.

(४) हंगाम २०१५-१६ करीता ऊस खरेदी कर माफीबाबत दि.२६.४.२०१६ च्या राजपत्रात नमुद केलेली साखर निर्यातीची अट वगळणेबाबत प्रस्ताव सादर करणे.

(५) हंगाम २०१५-१६ साठी FRP नुसार निघणा-या दरास अंतिम ऊसदर म्हणून मान्यता देणे व सर्व कारखान्यांची उत्पन्न विभागणीच्या आधारे निघणा-या दराबाबत माहिती मंडळासमोर सादर करणे.

वरील निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी बाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) दोन कारखान्यामधील हवाई अंतराची अट वगळणेबाबत साखर आयुक्त, पुणे यांचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

२) आर्यन शुगर, बार्शी, जि.सोलापूर यांचे RRC कारवाई संदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ व नियम १९६७ नुसार महसूल वसूलीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर प्रक्रिये अंतर्गत थकबाकीदाराने वसूली शासन जमा न केल्याने कारखाना तलाठी व मंडल अधिकारी यांनी सिल केला आहे. RRC प्रक्रिया सुरु झालेनंतर कारखान्यातील साखर किंवा मळी विक्रि करण्यात आली नाही, असा अहवाल जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सादर केला आहे.

३) ऊसतोडी व वाहतूक खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करणेकरीता साखर संचालक (प्रशासन), पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आह. समितीच्या शिफारसीवर सदस्यांचे अभिप्राय/सूचना मागविण्यात आल्या होत्या. समितीकडे प्राप्त झालेल्या शिफारसी मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येतील.

४) हंगाम २०१५-१६ करीता ऊस खरेदी कर माफीबाबत दि.२६.४.२०१६ च्या राजपत्रात नमूद केलेली साखर निर्यातीची अट वगळणेबाबत प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

५) FRP नुसार निघणा-या दरालाच हंगाम २०१५-१६ साठी अंतिम ऊसदर म्हणून मान्यता देण्यात आली. तसेच कारखान्यांची उत्पन्न विभागाच्या आधारे निघणा-या दराबाबत कारखानानिहाय माहिती मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येईल.

---

**भारतीय रिझर्व बँकेच्या आदेशानूसार एक लाखाच्या आतील कृषी कर्जाच्या नोंदी शेतक-यांच्या सातबा-यांवर न घेणे बाबत**

**(४३) ६१६७० (२२-०८-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांच्या एक लाखापर्यंतच्या कृषी कर्जाच्या नोंदी शेतक-यांच्या सातबारा उता-यांवर घेण्यात येवू नयेत असे आदेश भारतीय रिझर्व बँकेने राज्यातील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय रिझर्व बँकेच्या आदेशाप्रमाणे एक लाखाच्या आतील कृषी कर्जाच्या नोंदी शेतक-यांच्या सातबा-यांवर घेण्यात येवू नयेत अशा सूचना जालना जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील शेतकरी, तलाठी व बँकांना देण्यात आलेल्या आहेत का,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहे व याबाबत शासनाची भूमिका काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात एकाधिकार पध्दतीने कांदा खरेदी करुन निर्यात करावा तसेच कांदाचाळीसाठी शेतक-यांना १०० टक्के अनुदान देणेबाबत**

**(४४) ६२१९० (२०-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात दुष्काळी स्थिती असताना प्रयत्नपूर्वक जगविलेला कांदा कवडीमोलाने विकला जात असल्याने संतप्त कांदा उत्पादकांनी दिल्ली गट वेशीला कांदयाचा फास लटकावून आक्रोश आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने एकाधिकार पध्दतीने कांदा खरेदी करुन निर्यात करावा व कांदाचाळीसाठी शेतक-यांना १०० टक्के अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-१०-२०१६) :** (१) होय.
(२) कांदा निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यशासनाने केंद्रशासनाकडे पाठपुरावा करून डिसेंबर, २०१५ पासून किमान निर्यात मुल्य शून्य केले आहे.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत कांदाचाळीसाठी शेतक-यांना ५०% अनुदान दिले जाते. राष्ट्रीय फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मागील ३ वर्षात ७६८० कांदाचाळीसाठी रूपये ४८७८.५२ लाख अनुदान शेतक-यांना देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळातंर्गत गांदिया व भंडारा जिल्हयातील खरीप धान खरेदी केंद्र व राईस मिलला जवळचे केंद्र सोडून लांबच्या अंतरावर जावे लागत असल्याबाबत**

**(४५) ६२५९८ (१२-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळातंर्गत गोंदिया व भंडारा जिल्हयातील खरीप धान खरेदी केंद्र व राईस मिलला गावाजवळचे केंद्र सोडून शेतक-यांना धानाला भरडाईसाठी लांबच्या अंतरावर जावे लागत असल्यामुळे शेतक-यांना धानाची उचल करण्यासाठी चिखली, कनेरी किंवा

कोहमारा या जवळच्या ठिकाणी देण्याबाबत आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग आधिकारी दुर्लक्ष करीत असल्याबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री तसेच मा.मंत्री अन्न व नागरी पुरवठा यांच्याकडे दिनांक २ जून, २०१६ वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार गावातील शेतक-यांसाठी शासनाच्या मदतीच्या योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

प्रादेशिक व्यवस्थापक, भंडारा यांचे कार्यक्षेत्रात गोंदिया जिल्ह्यातील देवरी, सडक अर्जूनी, मोरगाव अर्जूनी, सालेकसा आमगाव व मोरेगाव या तालुक्यांचा काही भाग आदिवासी उपयोजना क्षेत्रात येत असून जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या खरेदी केंद्रावर धानाची खरेदी करण्यात येऊन व तेथून जवळच्या राईस मिलला भरडाईसाठी आदेश देण्यात येतात. खरेदी अथवा भरडाई सबंधीची लेखी तक्रार प्रादेशिक कार्यालय, भंडारा यांचेकडे उपलब्ध नाहीत.

(२) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २३ शासकीय अनुदानित आश्रमशाळात शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(४६) ६२६७२ (१२-०८-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी येथील (जि.ठाणे) शहापूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २३ शासकीय अनुदानित आश्रमशाळा असून तेथील शिक्षण भरती प्रक्रिया रखडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळांमध्ये ३३६ मुख्याध्यापक व शिक्षकांची गरज असतांना तेथे तब्बल ८३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :**(१) अशंत: खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत २३ शासकीय व १३ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत.

मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.८७८३/२०१४ दाखल केली असून मा.न्यायालयाने दि.१५/०५/२०१५ आदेशानुसार अनुसूचित क्षेत्रातील भरतीस अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे.

(२) अशंत: खरे आहे.

शहापूर प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकासह शिक्षकांची एकूण ३०५ पदे मंजूर असून २२७ पदे भरलेली आहेत व ७८ पदे रिक्त आहेत. अनुदानित आश्रमशाळेत १९० पदे मंजूर असून १७९ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत.

(३) मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.८७८३/२०१४ दाखल केली असून मा.न्यायालयाने दि.१५/०५/२०१५ आदेशानुसार अनुसूचित क्षेत्रातील भरतीस अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम आदेशान्वये स्वगिती दिलेली आहे.

तथापि, शासकीय आश्रमशाळेतील रिक्त पदे पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदे भरण्याची कार्यवाही अपर आयुक्त, ठाणे यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गेवराई तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना पिक विम्याचे वाटप करणेबाबत

**(४७) ६४०६३ (२२-०८-२०१६). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना आधार असलेला पिक विमा तेथील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकातील कर्मचा-यांच्या दुर्लक्षामुळे शेतक-यांना पिक विम्याचे वाटप होण्यात दिरंगाई झाली आहे, हे खरे आह काय,

(२) असल्यास, पिक विम्याच्या पैशातून शेतक-यांना कर्जाची रक्कम वळती करून घेण्याची तेथील बँकांची भूमिका असल्याने व त्यामुळे पिक विम्याचे पैसे शेतक-यांच्या हातात येत नसल्याने शेतक-यांमध्ये नाराजी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेवराई तालुक्यातील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकाना शासनाकडून योग्यते आदेश देण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य लघू उघोग विकास महामंडळातील जनरल मॅनेजरनी करोडो रूपयांचा केलेला भष्ट्राचाराबाबत

**(४८) ६४३११ (२२-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य लघू उघोग विकास महामंडळामध्ये कार्यरत असलेल्या जनरल मॅनेजर यांनी सर्व कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग लागू करून देण्यासाठी मंत्रालयात पैसे द्यावे

लागणार असल्याने त्याकरीता सर्व कर्मचा-यांकडून ३५ लाख रूपये जमा करणे, याबाबत तक्रार होताच चौकशी अंती, सबंधित जनरल मॅनेजरनी ३५ लाख रूपये कर्मचा-यांकडून गोळा करण्यात आले असून सदर रक्कम माझ्याकडे जमा करण्यात आले असल्याचे चौकशी समितीला सांगीतले असताना सुध्दा अद्यापही जनरल मॅनेजरवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता त्याची पदोन्नती करण्यात आलेली असल्याची माहिती माहे १० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, याच जनरल मॅनेजर यांनी महिला व बाल विकास विभागातंर्गत येणा-यां आंगणवाडी केंद्राकरीता ११ करोड रूपयांचे मेडीकल किट विना निविदा थेट पियेस्ट फॉरमाक्यूलीकल कंपनी देवून महामंडळाचे लाखो रूपयांनी नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची राज्य शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, राज्य शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी संबधित जनरल मॅनेजर वर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-११-२०१६) :** (१) नाही. सदर रक्कम संघटनेच्या पदाधिका-यांनी कर्मचारी /अधिकारी यांचे कडून गोळा केलेली होती.

(२) महामंडळाचे नुकसान झाले हे खरे नाही. सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षी अंगणवाडी केंद्राकरीता खरेदी केलेल्या मेडीकल किट खरेदी प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत विभागीय चौकशी करण्यात आली आहे.

(३) या प्रकरणी महामंडळाने विभागीय चौकशी केली आहे.

(४) महामंडळाने संबंधित जनील मॅनेजर यांची विभागीय चौकशी करुन त्यांना ३ वेतनवाढी कायम स्वरुपी थांबविण्याची शिक्षा दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने लाखो शेतक-यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन न केल्याबाबत

**(४९) ६४४९९ (२२-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळी परिस्थितीमुळे पीक दर्जाचे पुनर्गठन करण्यात येईल. अशी घोषणा शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात वा त्या सुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकने लाखो शेतक-यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन केलेले नाही. अशी तक्रार जळगांव जिल्हा कृषी उत्पन्न समितीचे उपसभापती यांनी जिल्हा उपनिबंधक, जळगांव याचेकडे ३० मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळ ग्रस्त भागातील शेतक-यांचे बँक कर्जावरील व्याज माफीबाबत**

**(५०) ६४५०५ (२२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळ ग्रस्त भागातील शेतक-यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी सहकारी बँकाकडून शेतक-यांना देण्यात येणा-यां कर्जावरील व्याज माफ करण्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने सहकार मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केल्याची माहिती माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने व्याज माफीबाबत शिफारस केली आहे काय व त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१६) :**(१) होय हे खरे आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना प्रभावशाली करणे, सध्याच्या पध्दतीतील उणिवा शोधून काढणे व तोट्याची कारणे समजून घेऊन बँकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे त्याचप्रमाणे शेतक-यांना प्रत्यक्ष कर्ज देतांना आकारण्यात येणारे व्याजदर कमी करण्याबाबत व यासंबंधी मुद्यांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने, शासन निर्णय दिनांक २४/०६/२०१६ अन्वये मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.